**खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे**

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

**राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे**

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२३ – २४

### खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळ– वार्षिक सभा

लोकमत

## खेड तालुका शिक्षण मंडळाची वार्षिक सभा

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरूनगर : खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची ४९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांच्या अध्यक्षतेखाली हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात (दि. २२ रोजी) खेळीमेळीच्या वातावरणात झाली.

संस्थेच्या वार्षिक अहवालाचे व मागील विशेष सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताचे वाचन उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी केले. या वर्षापासून संस्थेचे सुवर्ण महोत्सवी वर्ष सुरू होत असल्याने त्या संदर्भात आयोजित करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांना सभेने एकमताने मंजुरी दिली. संस्थेने साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयाच्या बांधकामासाठी केलेली जागा खरेदी व विस्तारित नवीन इमारतीच्या बांधकामाची माहिती संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी सभासदांना दिली.

विषयपत्रिकेनुसार झालेल्या चर्चेत अनिल राक्षे, शांताराम घुमटकर, माउली करंडे, प्रदीप कासवा, मारूतराव बारणे, साहेबराव देशमुख आदी सभासदांनी सहभाग घेऊन संस्थेच्या कामकाजाबद्दल आनंद व्यक्त केला.

खेड तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या तालुकाध्यक्षपदी हिरामण सातकर, राष्ट्रवादी जिल्हा उपाध्यक्षपदी अनिल राक्षे, राजगुरूनगर सहकारी बँकेचे उपाध्यक्ष म्हणून अविनाश कहाणे, जिल्हा तक्रार निवारण आयोगाच्या अध्यक्षपदी डॉ. प्रकाश चौधरी आणि भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या जिल्हाध्यक्ष पदावर सुरेश टाकळकर यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. संस्थेच्या विविध शैक्षणिक शाखांचे प्रतिनिधी म्हणून प्राचार्य डॉ. एस.एस. पिंगळे, प्राचार्य डॉ. एच.एम. जरे, मुख्याध्यापक डी.एस. धुमाळ आणि प्रबंधक के.आर. पाचारणे यांनी कामकाज पार पाडण्यास सहकार्य केले. प्रास्ताविक संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी व आभार हिरामण सातकर यांनी मानले.

Hello Pune Gramin
Page No. 3 Sep 23, 2023
Powered by: erelego.com

सकाळ

# खेड शिक्षण प्रसारक मंडळ करणार सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त उपक्रम

**राजगुरुनगर, ता. २५ :** खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची ४९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांच्या अध्यक्षतेखाली हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात शुक्रवारी (ता. २२) खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

संस्थेच्या वार्षिक अहवालाचे व मागील विशेष सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताचे वाचन उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी केले. उपस्थित सभासदांनी त्यास एकमताने मंजुरी दिली. या वर्षापासून संस्थेचे सुवर्णमहोत्सवी वर्ष सुरू होत असून त्या संदर्भात आयोजित करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांना सभेने एकमताने मंजुरी दिली.

संस्थेने साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयाच्या बांधकामासाठी केलेली जागा खरेदी व विस्तारित नवीन इमारतीच्या बांधकामाची माहिती संस्थाध्यक्ष बुट्टेपाटील यांनी सभासदांना दिली. विषयपत्रिकेनुसार झालेल्या चर्चेत शांताराम घुमटकर, साहेबराव देशमुख, माऊली करंडे, प्रदीप कासवा, मारुतराव बारणे यांनी सहभाग घेतला. खेड तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरद पवार गट) तालुकाध्यक्षपदी हिरामण सातकर, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) जिल्हा उपाध्यक्षपदी अनिल राक्षे, राजगुरुनगर सहकारी बँकेच्या उपाध्यक्षपदी अविनाश कहाणे, जिल्हा तक्रार निवारण आयोगाच्या अध्यक्षपदी डॉ. प्रकाश चौधरी व पुणे जिल्हा भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या जिल्हाध्यक्षपदी सुरेश टाकळकर यांची निवड झाल्याबद्दल, त्यांचा संस्थेच्या वतीने सत्कार केला.

या प्रसंगी प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, मुख्याध्यापक डी. एस. धुमाळ व प्रबंधक के. आर. पाचारणे यांनी कामकाज पार पाडण्यास सहकार्य केले.

Pune, District-Today
26/09/2023 Page No. 4

# खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची सभा खेळीमेळीत

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची ४९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात शुक्रवारी (दि. २२) खेळीमेळीच्या वातावरणात झाली. या प्रसंगी मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते.

संस्थेच्या वार्षिक अहवालाचे व मागील विशेष सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताचे वाचन उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी केले. उपस्थित सभासदांनी त्यास एकमताने मंजुरी दिली. या वर्षापासून संस्थेचे सुवर्णमहोत्सवी वर्ष सुरू होत असल्याने त्या संदर्भात आयोजित करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांना सभेने एकमताने मंजुरी दिली.

संस्थेने साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालयाच्या बांधकामासाठी केलेली जागा खरेदी व विस्तारित नवीन इमारतीच्या बांधकामाची माहिती संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी सभासदांना दिली. विषयपत्रिकेनुसार झालेल्या चर्चेत अनिल राक्षे, शांताराम घुमटकर, माऊली करंडे, प्रदीप कासवा, मारुतराव बारणे, साहेबराव देशमुख आदी सभासदांनी सहभाग घेऊन संस्थेचे कामकाजाबद्दल आनंद व्यक्त केला.

खेड तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या तालुकाध्यक्षपदी हिरामण सातकर, राष्ट्रवादी जिल्हा उपाध्यक्षपदी अनिल राक्षे, राजगुरूनगर सहकारी बँकेचे उपाध्यक्ष म्हणून अविनाश कहाणे, जिल्हा तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्षपदी डॉ. प्रकाश चौधरी आणि पुणे जिल्हा भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या जिल्हाध्यक्षपदी सुरेश टाकळकर यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा संस्थेच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला.

संस्थेच्या विविध शैक्षणिक शाखांचे प्रतिनिधी म्हणून प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, मुख्याध्यापक डी. एस. धुमाळ आणि प्रबंधक के. आर. पाचारणे यांनी कामकाज पार पाडण्यास सहकार्य केले. प्रास्ताविक व स्वागत संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले. संचालक हिरामण सातकर यांनी आभार मानले.

My Gramin Edition
Sep 26, 2023 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

पुढारी

# खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची सभा खेळीमेळीत

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाची ४९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली हुतात्मा राजगुरू महाविद्यालयात शुक्रवारी (दि. २२) खेळीमेळीच्या वातावरणात झाली. या प्रसंगी मोठ्या संख्येने सभासद उपस्थित होते.

संस्थेच्या वार्षिक अहवालाचे व मागील विशेष सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताचे वाचन उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांनी केले. उपस्थित सभासदांनी त्यास एकमताने मंजुरी दिली. या वर्षापासून संस्थेचे सुवर्णमहोत्सवी वर्ष सुरू होत असल्याने त्या संदर्भात आयोजित करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांना सभेने एकमताने मंजुरी दिली.

संस्थेने साहेबरावजी बुट्टे पाटील महाविद्यालयाच्या बांधकामासाठी केलेली जागा खरेदी व विस्तारित नवीन इमारतीच्या बांधकामाची माहिती संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी सभासदांना दिली. विषयपत्रिकेनुसार झालेल्या चर्चेत अनिल राक्षे, शांताराम घुमटकर, माऊली करंडे, प्रदीप कासवा, मारुतराव बारणे, साहेबराव देशमुख आदी सभासदांनी सहभाग घेऊन संस्थेचे कामकाजाबद्दल आनंद व्यक्त केला.

खेड तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या तालुकाध्यक्षपदी हिरामण सातकर, राष्ट्रवादी जिल्हा उपाध्यक्षपदी अनिल राक्षे, राजगुरूनगर सहकारी बँकेचे उपाध्यक्ष म्हणून अविनाश कहाणे, जिल्हा तक्रार निवारण आयोगाचे अध्यक्षपदी डॉ. प्रकाश चौधरी आणि पुणे जिल्हा भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या जिल्हाध्यक्षपदी सुरेश टाकळकर यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा संस्थेच्या वतीने विशेष सत्कार करण्यात आला.

संस्थेच्या विविध शैक्षणिक शाखांचे प्रतिनिधी म्हणून प्राचार्य डॉ. एस. एस. पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, मुख्याध्यापक डी. एस. धुमाळ आणि प्रबंधक के. आर. पाचारणे यांनी कामकाज पार पाडण्यास सहकार्य केले. प्रास्ताविक व स्वागत संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील यांनी केले. संचालक हिरामण सातकर यांनी आभार मानले.

My Gramin Edition
Sep 26, 2023 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**